# हिवाळ्यात बेडूक

मैक्स





# हिवाळ्यात बेडूक

मैक्स



मराठी : अश्विनी बर्वे





जेव्हा एक दिवस सकाळी बेडूक उठलं तेव्हा त्याला लगेच लक्षात आलं की जगात काहीतरी गडबड आहे, बाहेर सगळं काही बदललं आहे असं वाटतं.

तो खिड़कीजवळ गेला आणि तो बाहेर बघतांना चकित झाला. बाहेर सगळं काही पांढरं शुभ्र झालं होतं.





तो नकळत बाहेर पळाला. सगळीकडे बर्फच होतं. त्याचे पाय घसरायला लागले. अचानक त्याला वाटलं की तो मागच्या बाजूला पडत आहे.

.. किनाऱ्यावर,नदीत. सगळीकडे नदीचा बर्फ झाला होता. मग बेडूक थंड,कठीण बर्फावर आपल्या पाठीवर पडला.

“जर पाणी नसेल तर मी अंघोळ करू शकणार नाही,” त्याने विचार केला. मग तो चकित झाला.



थंडीने कापत बेडूक किनाऱ्यावर बसला, तेव्हा बदक स्केटिंग करत वेगाने त्याच्याकडे आलं. “हॅलो, बेडका,” ते म्हणाले, “आज हवा खूप छान आहे, तू स्केटिंग करायला येणार नाही का?”

“नाही, मला खूप थंडी वाजत आहे,” बेडकाने उत्तर दिले.

“पण स्केटिंग तुझ्यासाठी चांगलं आहे,” बदक म्हणाले. “मी तुला स्केटिंग शिकवतो.”





मग बदकाने बेडकाला आपले स्केट्स आणि आपलं मफलर दिला. बदकाने बेडकाला धक्का दिला आणि तो लवकरच बर्फावर घसरू लागला. पण फार वेळ नाही, लवकरच बेडूक खाली पडले.

"तुला स्केटिंग करतांना मजा येत नाही का?" बदकाने विचारले. पण बेडूक थंडीने पार गार पडला होतं आणि त्याचे दाट वाजत होते.

"तुझ्याकडे गरम पंखांचा कोट आहे, पण मी पूर्णपणे नंगा आहे," बेडूक म्हणाले.

"तू बरोबर म्हणत आहे," बदक म्हणाले. "चांगलं होईल जर तू माझा मफलर तुझ्याजवळ ठेवला तर, कारण आता मला जावं लागेल."





मग डुक्कर आपल्या पाठीवरच्या टोपलीत जाळण्यासाठी लाकडं घेवून जातांना दिसलं.

“तुला थंडी वाजत नाही का डुकरा?” बेडकाने विचारलं.

"बिलकुल नाही! मी ताज्या, स्वस्थ हवेचा आनंद घेत आहे. हिवाळा सगळ्यात छान ऋतू आहे,” डुक्कर म्हणाले.

“तुझ्याजवळ स्वतःला गरम ठेवण्यासाठी चांगली त्वचा आहे, पण माझ्याजवळ काय आहे?” बेडकाने विचारले.

"गरीब बेडूक,“ डुकराने विचार केला. “जर मला त्याला काही मदत करता आली असती तर.”





“एक-दोन! एक-दोन!” म्हणत ससा पळत होता. तो बर्फावर वेगाने धावण्याचा अभ्यास करत होता.

"हुर्रे!" तो आनंदाने ओरडला. “खेळाने शरीर स्वस्थ होतं! खेळासाठी हुर्रे! खेळाचा जय-जयकार!"

“तू माझ्या बरोबर धाव,बेडका? फिट राहण्याची मजा काही औरच आहे.”

“मी थंडीने गारठत आहे,” बेडूक म्हणालं.

“तुझ्याजवळ शरीराला गरम ठेवण्यासाठी फर आहे, पण माझ्याजवळ तसं काही नाही,” दुःखी होत बेडूक म्हणाले. मग तो घरी निघून गेला.



दुसऱ्या दिवशी बेडकाला मित्रांनी स्नोबॉल मॅच खेळण्यासाठी बोलावलं. पण बेडूक त्या मस्तीच्या खेळात भाग घेवू शकला नाही.

“मी थंडीने गारठत आहे,” तो बडबडला. “मी एक नंगा बेडूक आहे.” मी थंडीने गारठत आहे.“ मग दुःखी होत आपल्या घराकडे गेला.





तो बाकी पूर्ण दिवस शेकोटीजवळ बसून राहिला आणि वसंताचे आणि उन्हाचे स्वप्नं बघत राहिला. त्याने लाकडाचा शेवटचा तुकडा सुद्धा जाळून टाकला.

जेव्हा शेकोटी विझली, तेव्हा तो अजून लाकडं गोळा करण्यासाठी बाहेर गेला. पण बर्फात त्याला काही लाकडं मिळाली नाही.





तो पुढे जात राहिला, जात राहिला आणि शेवटी तो रस्ता चुकला. चारी बाजूला सगळं काही सफेद होतं. थकून तो बर्फावर झोपला-एक नंगं बेडूक.

पण त्याच्या मित्रांनी त्याला तिथं सुद्धा शोधून काढलं.

“मी गारठलो आहे,” बेडूक कुजबुजला.

“चल,” ससा म्हणाला. मग त्यांनी काळजीपूर्वक बेडकाला घरी आणलं आणि त्यांनी त्याला त्याच्या अंथरुणावर झोपवलं.





सशाने लाकडं गोळा केली आणि आग पेटवली.डुकराने गरमागरम सूप केलं आणि बदकाने बेडकाला हसवण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर प्रत्येक संध्याकाळी,सगळे मित्र मिळून वसंत आणि उन्हाळ्याच्या गोष्टी ऐकल्या, ज्या सशाने वाचून दाखवल्या. डुकराने दोन रंगाची लोकर घेवून बेड्कासाठी गरम स्वेटर विणले. बेडकाला आपल्या मित्रांची सोबत आणि त्यांची उदारता खूप आवडली. हिवाळ्याचा ॠतू मोठा अद्भुत असतो जेव्हा तो आपण आपल्या अंथरुणावर घालवतो.





मग तो दिवस आला जेव्हा बेडूक बरं झालं आणि तो उठू-बसू लागला. मग फर,कातडी व पंखांच्या शिवाय बेडूक आपलं नवीन स्वेटर घालून बर्फावर थोडी पावलं चाललं.

“काय?“ सशाने उत्सुकतेने विचारलं.

“खूप छान वाटत आहे,” बेडकाने धैर्याने उत्तर दिलं.

अशा प्रकारे लांबलेला हिवाळा संपला. पण एका सकाळी, जेव्हा बेडकाने आपले डोळे उघडले, तेव्हा त्याला बाहेर काहीतरी वेगळंच वाटत होतं. खिडकीतून स्वच्छ प्रकाश आत येत होता. बेडूक लवकर अंथरुणावरून उठला आणि उड्या मारत बाहेर धावलं.



बाहेरचे जग चमकणारे आणि हिरवे होते आणि आकाशात सूर्य चमकत होता.

"हुर्रे!" ते ओरड्लं. “बेडूक होणं किती छान आहे, किती अद्भूत आहे! आता मी आपल्या उघड्या पाठीवर सूर्याची किरणं अनुभवू शकेल.

बेडकाला खूप आनंदी पाहून त्याचे मित्र खूप आनंदी झाले.

“बेडकाशिवाय आपण काय करणार?” ससा हसत म्हणाला.

“बेडकाशिवाय आपण आपल्या आयुष्याचा विचारही करू शकत नाही,” डुक्कर म्हणाले.

“बरोबर आहे,“ बदक सहमती दर्शवत म्हणालं. “बेडकाशिवाय आपलं जीवन आनंदी असणार नाही.”

